**जलसंपदा विभागाच्या मध्यम व मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या कामासाठी गौण खनिज सुलभपणे व नियमितपणे उपलब्ध होण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः गौखनि-१०/०४१६/प्र.क्र.५८२/ख**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख: ०४ जानेवारी, २०१८

<u>वाचा</u>

**१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८**

**२) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३**

**शासन परिपत्रक:-**

राज्यात विविध भागात मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प राबविण्यात येत असून अशा प्रकल्पांसाठी माती, मुरूम व दगड यांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. सदर पाटबंधारे प्रकल्पांची कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी माती, मुरुम व दगड हे गौण खनिज सुलभपणे व नियमितपणे उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने या संदर्भातील कार्यपध्दती सुरळीत करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे दिशानिर्देश निर्गमित करण्यात येत आहेत :-

(अ) राज्यातील मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांच्या कंत्राटदारांनी, संबंधित प्रकल्पाच्या कामाच्या मंजूर अंदाजपत्रकानुसार आवश्यक गौण खनिजाचे परिमाण, अशा गौण खनिज उत्खननाची नियोजित ठिकाणे व त्यांच्या गाव नमुना नंबर ७/१२ उतारे यासह संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे, गौण खनिजाच्या उत्खननाच्या परवानगीसाठी विहित नमुन्यात अर्ज जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यामार्फत सादर करावा.

(आ) जिल्हाधिकारी यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्यामार्फत संबंधित कामासाठी आवश्यक असलेल्या गौण खनिजासाठी गौण खनिजाच्या स्त्रोतांची तपासणी करुन, सदर ठिकाणे जिल्हा खाणकाम योजनेत समाविष्ट असल्याची खात्री करुन घ्यावी. अशी ठिकाणे जिल्हा खाणकाम योजनेत समाविष्ट नसल्यास, मात्र खाणकामासाठी उपयुक्त असल्यास त्यांचा समावेश जिल्हा खाणकाम योजनेत करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(इ) तद्नंतर संबंधित पाटबंधारे प्रकल्पाच्या कामाच्या मंजूर अंदाजपत्रकात नमूद गौण खनिजाच्या परिमाणाच्या आधारे स्वामित्वधनाची पूर्ण रक्कम संबंधित कामाच्या कंत्राटदाराकडून आगाऊ शासनजमा करुन, जिल्हाधिकारी यांनी अशा नियोजित ठिकाणातून खाण कामासाठी तात्पुरते परवाने, अर्ज केल्यापासून जास्तीत जास्त ३०

दिवसात मंजूर करावेत व अशा परवान्याची प्रत संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

(ई) संबंधीत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व क्षेत्रीय महसूल यंत्रणेने अशा तात्पुरत्या उत्खनन परवान्यांच्या आधारे होणाऱ्या गौण खनिजाच्या उत्खननाच्या/वापराच्या परिमाणाबाबत वेळोवेळी तपासणी करावी. मात्र मंजूरीपेक्षा जास्त उत्खनन झाल्याचे किंवा संबंधित पाटबंधारे प्रकल्पांतर्गत मंजुरीपेक्षा जास्त गौण खनिज वापरण्यात आल्याचे दृष्टोत्पत्तीस आल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी सदर प्रकल्पाचे काम न थांबविता त्यांच्या स्तरावर नियमानुसार संबंधित कंत्राटदारास कारवाईची नोटीस देवून ही बाब त्याचवेळी जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणावी.

(उ) जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्याकडून प्राप्त अहवालाची छाननी करुन, कंत्राटदाराची कृती प्राधिकरणाच्या संबंधित क्षेत्रीय अभियंत्याच्या निदर्शनास लेखी आणून, जास्तीच्या गौण खनिज उत्खननापोटी/ वापरापोटी वाढीव स्वामित्वधनाची रक्कम ३० दिवसाच्या आत शासनजमा करण्याबाबत संबंधित ठेकेदारास विनाविलंब कळविण्यात यावे.

(ऊ) संबंधीत ठेकेदाराने ३० दिवसाच्या आत गौण खनिजाच्या वाढीव उत्खननापोटी/ वापरापोटी स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा केल्यास एक विशेष बाब म्हणून त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८(७) नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येऊ नये. मात्र संबंधित ठेकेदाराने ३० दिवसाच्या आत गौण खनिजाच्या वाढीव उत्खननापोटी/ वापरापोटी स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा न केल्यास तो दंडात्मक कारवाईस पात्र राहील.

२. सदर पाटबंधारे प्रकल्पांमुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर सिंचन सुविधा निर्माण होऊन, राज्याच्या कृषी विकासास चालना मिळणार आहे. त्यामुळे राज्यातील मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पाची कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी कोणत्याही प्रकारे अडथळा येणार नाही. याबाबतची दक्षता सर्व क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांनी कटाक्षाने घ्यावी.

३. उपरोक्त निर्देश हे जलसंपदा विभागाच्या मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या कामासंबंधीच लागू राहतील.

४. सदर शासन परिपत्रक वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक विवि/शिकाना/ ७८/२०१७, दिनांक १३ डिसेंबर, २०१७ नुसार दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**५.** सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०१०५१०५५३२५८१९ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Kshirsagar

Digitally signed by Rajendra Kshirsagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e673df1a1f6243d932fcb8679fc8cd85d90c61495ae8b4592f8dcc5b8a851a8, cn=Rajendra Kshirsagar
Date: 2018.01.05 10:58:51 +05'30'

**(राजेंद्र क्षीरसागर)**
शासनाचे सह सचिव

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव (पत्राने), राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मंत्रालयीन विभाग.
५) सर्व विभागीय आयुक्त.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड
७) सर्व जिल्हाधिकारी.
८) सर्व उपविभागीय अधिकारी.
९) सर्व तहसिलदार.
१०) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
११) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
१२) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरीक्षा), मुंबई.
१३) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरीक्षा), नागपूर.
१४) निवडनस्ती "ख" कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई ४०० ०३२.